
ISSN NO. : 0973-2845

# समाज प्रबोधन पत्रिका



वर्ष ५६
अंक २२४
ऑक्टोबर-डिसेंबर २०१८

Scanned with OKEN Scanner

# समाज प्रबोधन पत्रिका

समाज प्रबोधन संस्थेचे प्रकाशन
आय.एस.एस.एन. ०९७३-२८४५

वर्ष ५६
अंक २२४
ऑक्टो. - डिसें. २०१८


अनुक्रम


| | | |
|---|---|---|
| १ स्वातंत्र्याचा मार्ग | नयनतारा सहगल | ३ |
| २ पहिले महायुद्ध | अशोक चौसाळकर | १० |
| ३ मुसलमानांसंबंधी टिळकांची भूमिका | भास्कर लक्ष्मण भोळे | १८ |
| ४ मराठी चित्रपटातील शिवाजी महाराज, 'हिंदुत्व आणि राजकारण' | शिवाजी मोटेगावकर | २४ |
| ५ महाराष्ट्रातील भारतीय जनसंघ १९५२-७७ राजकीय इतिहास आणि निवडणुकीतील कामगिरी | अभय दातार | ३२ |
| ६ कालच्या विधानसभा निवडणुका – भारतीय लोकशाहीची स्वनियमाची शैली | श्रीरंजन आवटे | ४५ |
| ७ तेलंगण : प्रादेशिक अस्मिता आणि के.सी.आर यांचा करिश्मा | ऋतुराज बुवा | ५५ |
| ८ ऊसतोडणी मजुरांचे स्थलांतरित जगणं (बीड जिल्ह्याचा अभ्यास) | कुमार शिराळकर व इतर | ६२ |
| □ श्रद्धांजली | | |
| ९ स्मरण/विष्णू खरे | गणेश विसपुते | ७४ |
| १० अन्नपूर्णादेवी | – | ७९ |
| □ ग्रंथ परीक्षण | | |
| ११ वित्त भांडवल आणि डावी चळवळ | अवधूत नाडकर्णी | ८३ |
| १२ मराठी कादंबरीच्या आशयाविष्काराचे मूल्यमापन | केदार काळवणे | ८७ |
| □ पुनर्वाचन | | |
| १३ मार्क्सवाद आणि गांधीवाद | आचार्य शं. दा. जावडेकर | ९६ |
| १४ पुस्तक परिचय | | १०२ |


Scanned with OKEN Scanner

# मराठी कादंबरीच्या आशयाविष्काराचे मूल्यमापन

† केदार काळवणे

कादंबरी हा विस्तृत सामाजिक-भाषिक अवकाशाला कवेत घेणारा वाङ्मयप्रकार आहे. सांस्कृतिक जीवनाशयाचा अन्वयार्थ लावणारा दस्तऐवज आहे. अन्य कोणत्याही वाङ्मयप्रकारापेक्षा अधिक समाजलक्ष्यी असणारा हा प्रकार म्हणूनच अलीकडच्या काळात जीवनार्थ प्रकटण्याच्या दृष्टीने महत्त्वाचा ठरलेला आहे. मराठी कादंबरीला सामाजिकतेचे भान साठोत्तरी काळानंतर अधिक तीव्रतेने येत गेले. जीवनवास्तवाला जाणीवपूर्वक कादंबरीचा आशय बनवले गेले. कादंबरीच्या आशयातून त्याच्या रूपालाही आकार प्राप्त होत असतो. प्रयोगशीलताही आशयभारितच असते. कादंबरीचा आशय आणि आविष्कार यांचा सुटासुटा विचार करता येत नाही, याचे भानही मराठी समीक्षेला साठोत्तरीनंतरच आले. कलावाद की जीवनवाद हा वाद येथे निकाली निघाला. सामाजिक व सांस्कृतिक नजरेतून मराठी कादंबरीचे वाचन करणारी समीक्षेची परंपरा सुरुवातीपासून होतीच; परंतु तिचे स्वरूप क्षीण असेच होते. ही परंपरा या काळात अधिक ठळक झाली. याच दृष्टीने मराठी कादंबरीच्या आशयाविष्काराचा अन्वयार्थ दत्ता घोलप यांनी लावला आहे. 'मराठी कादंबरी : आशय आणि आविष्कार' या शीर्षकाचा त्यांचा एकशे बासष्ट पृष्ठांचा समीक्षाग्रंथ प्रसिद्ध झाला आहे. ''साहित्यकृती हे एक सामाजिक आणि सांस्कृतिक रचित असते आणि एकाहून अधिक जाणिवांनी तिला आकार दिलेला असतो,''[१] याचे भान या समीक्षेला आहे. तसेच, साहित्यकृतीचा समकाळातील सर्व प्रकारच्या व्यवस्था तथा घटिते, विचारप्रणाली आणि प्रतीकसृष्टीशी संबंध असतो. त्या संबंधाची अन्वयदृष्टी या ग्रंथातून स्पष्ट होते.

कादंबरी निर्मितीची आशयसामग्री ही सामाजिकतेशी निगडित असते. सामाजिक व्यवस्थांचे तळकोपरे कादंबरीमधून उजागर होत असतात. त्यातून व्यक्तिमन आणि समाजमनाची स्पंदने व्यक्त होतात. कादंबरी ज्या अनुभवाचे दर्शन घडवते, त्या अनुभवाला त्या-त्या समूहाच्या संस्कृतीचा स्पर्श झालेला असतो. समाजावकाशातील जीवनतत्त्वे आणि जीवनरीतींच्या आविष्काराबरोबरच कादंबरी ही कोणत्या तरी विशिष्ट भूमीवर उभी असते. हा दृष्टिकोन या ग्रंथातील समीक्षेतून ध्वनित होतो. प्रास्ताविकात दत्ता घोलप म्हणतात, ''मराठी कादंबरीचा आशयाविष्कार हा मराठी समाजाशी संबंधित आहे, अशी सततची पार्श्वभूमी या

† साहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग, शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय, कळंब, जि. उस्मानाबाद- ४१३५०७, इमेल : Kedar.kalwane.28gmail.com मो. : ७०२०६३४५०२



Scanned with OKEN Scanner

विवेचनाला आहे. कादंबरीच्या रूपबंधात आशय आणि आविष्कार या घटकांत दृढ स्वरूपाचे संबंध असतात.आशयाविष्कार हे एकमेकांच्या प्रभाव व परिणामातून घडत वा विकसित होत जातात. कादंबरीतून आविष्कृत होणाऱ्या आशयाला साजेसा रूपबंध कादंबरीच्या आविष्कारातून येत असतो''(पृ.सात), ही भूमिका या ग्रंथाच्या कादंबरी आकलनविश्लेषणात केंद्रवर्ती आहे. त्यातून मराठी कादंबरीतील आशयसूत्रे आणि रूपबंधाच्या घडणीचे विवेचनही आलेले आहे. दोन विभागांत विभागलेल्या या ग्रंथात एकूण चौदा लेख आहेत. पहिल्या विभागातील सहा लेख कादंबरी आणि सांस्कृतिकता, प्रयोगशीलता, वर्तमान, नेमाडे प्रभाव व आविष्कारविशेष व ग्रामीणता या सूत्रांद्वारे मराठी कादंबरीची दीर्घ स्वरूपी मांडणी केली आहे. कादंबरीचा आकृतिबंध आणि समाज यांच्या परस्परसंबंधांचा घेतलेला शोध वैशिष्ट्यपूर्ण आहे. दुसऱ्या विभागातील आठ लेख 'कबीरा खडा बाजार में', 'हिंदूःजगण्याची समृद्ध अडगळ', 'आगळ', 'ब-बळीचा', 'उजव्या सोंडेच्या बाहुल्या', 'इन्किलाब विरुद्ध जिहाद', 'बगळा' आणि 'चारीमेरा' या एकेका कादंबऱ्यांचे विवेचन करणारे कादंबरीकेंद्रित लेख आहेत. या कादंबऱ्यांतील अंतरंगातून सामाजिक वास्तव कशा प्रकारे प्रकटले आहे, याचे मूल्यमापन केले आहे.

या ग्रंथातून एकूण मराठी कादंबरीच्या व्यापक पटाचा अवकाश विश्लेषणात सामावून घेत, महत्त्वाची निरीक्षणे नोंदवली असली, तरी या विवेचनाचा मुख्य रोख जागतिकीकरणोत्तर काळातील कादंबरीवर राहिलेला आहे. चौदापैकी अकरा लेख नव्वदनंतरच्या मराठी कादंबरीची मीमांसा करणारे आहेत. पैकी 'आजची मराठी कादंबरीः सांस्कृतिक परिप्रेक्ष्य', '१९९०नंतरच्या मराठी कादंबरीतील प्रयोगशीलता' व 'कादंबरी : वर्तमानाचे नवे रचित' हे तीन लेख या काळातील मराठी कादंबरीची स्वरूपमीमांसा करणारे महत्त्वाचे लेख आहेत. यातून दूरगामी प्रभाव करणाऱ्या अनेकविध पातळ्यांवरील बदलाने घडवलेल्या या काळाच्या संवेदनस्वभावाचे कोणते चित्र मराठी कादंबरीतून उमटले आहे, याचा मर्मज्ञ शोध घेतला गेला आहे. सामाजिक, सांस्कृतिक आणि प्रयोगशीलतेच्या अंगाने केलेली ही पाहणी; तसेच आशयाविष्काराचा वर्तमान घटितांशी असणाऱ्या नात्याचा लावलेला अन्वय मूलगामी आणि दिशादर्शक आहे.

साहित्य आणि संस्कृतीमधील आंतरसंबंधातील सेंद्रियत्व आणि त्याचा कादंबरीतील आशय व रूपबंधाशी असणाऱ्या जैवसंबंधांचा अनुबंध मांडत केलेली कादंबऱ्यांची तपासणी व्यामिश्र सांस्कृतिक पर्यावरणाचे विश्लेषण करणारी आहे. काळाला प्रभावित करणाऱ्या सामाजिक, आर्थिक, राजकीय घडामोडींचा निर्देश करत वेगवेगळ्या सामाजिक स्तरांतील व महाराष्ट्रातील विस्तृत भू-प्रदेशांतील पोटसमूह-पोटसंस्कृतीतून आलेल्या लेखकांच्या कादंबरीगत संस्कृती संवेदनाचा समर्पक वेध यातून घेतलेला आहे. जागतिकीकरणाचे प्रभावसंचित, वास्तववादी समूहसंस्कृती प्रक्रियेचा मूल्यशोध, कृषिकेंद्रित वास्तव आणि मूल्यव्यवस्था, ऐतिहासिक-पौराणिक आशयाचे समकालीन पर्यावरण, स्रीकेंद्री अनुभवविश्वाचे स्वरूप, भाषिक क्षेत्रचित्रण या परिप्रेक्ष्यात केलेली कादंबऱ्यांतील संस्कृतिचिकित्सा मोलाची आहे.

मोजक्या कादंबऱ्यांच्या आधारे आशयाचे प्रवृत्तिभेद लक्षात घेऊन केलेली ही मांडणी या काळातील मराठी कादंबऱ्यांची दिशा ध्वनित करणारी आहे. वर्तमानातील समाजचित्रणावर या कादंबरीने भर दिल्याने बहुतांश कादंबरीकारांना समाजव्यवस्थेच्या पोटात कार्यरत असणाऱ्या सांस्कृतिक संचिताचे, भांडवलशाहीने प्रस्थापित केलेल्या मूल्यव्यवस्थेतून आलेल्या सांस्कृतिक एकारलेपणाचे, परंपरा आणि नवतेच्या गोंधळातून आकारलेल्या संस्कृतिसंकराचे भान नसल्याचे या मांडणीतून अधोरेखित झाले आहे. कादंबऱ्यांमधून समाजवास्तवाची दृष्यात्मक तपशिलात वर्णने विपुल येतात; परंतु त्या वास्तवाला बळ देणाऱ्या परंपरा आणि सांस्कृतिक धारणासंचितासह वर्तमानाच्या



Scanned with OKEN Scanner

तळाशी असणाऱ्या सांस्कृतिक व्यवहाराचे चित्रण करण्यात या कादंबऱ्या कमी पडत असल्याचा निर्देश करत, ''मराठी समाजाच्या अंतःस्तरावरचा शोधपट मांडत, त्यांच्या बदलत्या सामाजिक धारणांसह आकारणाऱ्या एकूण मराठी समूहसंस्कृतीचे चित्रण या कादंबऱ्यांमधून दिसत नाही. बदलत्या नव्या काळाच्या परिमाणात सांस्कृतिक पट हा समाजाच्या अंतःस्तरावरच्या जाणिवांनिशी उलगडणाऱ्या बृहत्-कादंबरीच्या बहुप्रतीक्षेत मराठी वाचक आहे''(पृ.३७). ही या कादंबऱ्यांची नेमकी मर्यादा अभ्यासपूर्वक नोंदवली आहे.

कादंबरी ही फक्त रूपविषयक घटकांनी आकारत नाही, तर कलात्मक सामाजिक आशयातून तिला ललितकृतीचे स्वरूप लाभत असते. कादंबरीतील जीवनानुभव आणि आविष्कारशैलीमधील विशेष यात ठराविकपणा नसतो. रूपदृष्ट्या ती सतत प्रयोगशील होत असते. या दृष्टीने गेल्या पंचवीस वर्षांतील मराठी कादंबरीचे रूप कसे बदलत गेले, कोणत्या आवाहनक्षमता व आविष्कारशक्यता तीमधून ध्वनित झाल्या; तसेच समाजवास्तवाचे कोणते स्वरूप प्रकट झाले, याचा चिकित्सक शोध घेतला आहे. कादंबरीच्या संकेतव्यूहातील बदल, तीमधील रूपविस्तार, काळाने कादंबरीला दिलेला प्रतिसाद आणि काळ संरचनेत सामावताना निर्माण झालेल्या प्रयोगक्षम वाटांचा वेध प्रयोगशीलतेच्या अंगाने १९९०नंतरच्या कादंबरी संदर्भाने घेतला आहे. हा वेध घेताना प्रारंभीच प्रयोगसिद्धान्तन करून कादंबरी संरचनेतील लवचीकता आणि त्यामुळे निर्माण होत असलेल्या प्रयोगांच्या शक्यतांचा निर्देश केला आहे. प्रयोगशीलता ही आशयाच्या उत्कट व अनिवार्य मागणीतून आकाराला यायला हवी. मराठी साहित्यातील बहुतांश प्रयोगशीलता तशी येताना दिसत नाही. ती पाश्चात्त्य वाङ्मयाने प्रभावित केलेल्या तंत्राची नक्कल करत येताना दिसते. येथेही प्रयोगशीलतेचा विचार करताना आशयाची उत्कटता व तीव्रतेतून आकाराला आलेल्या प्रयोगशीलतेचे तत्त्व घोलप यांनी विश्लेषणात महत्त्वाचे मानलेले आहे.

कादंबरीच्या संरचनेवर वर्तमान वास्तवाचा खोलवर परिणाम होत असल्याने कादंबरीचा रूपबंध बदलतो. सामाजिक अवस्थांतरण आणि कादंबरी संकेतव्यूहातील परिवर्तने यांचा सेंद्रिय संबंध असल्याकारणाने गेल्या पंचवीस वर्षांतील घटना-घडामोडींच्या दाबातून ही कादंबरी प्रयोगशील झाली. अनेकविध जीवनक्षेत्रे वा वेगवेगळ्या भूप्रदेशातील नवे जग या काळातील कादंबरीच्या संरचनेत प्रवेशित झाल्याने ती संख्यात्मक आणि संरचनेच्या दृष्टीने बदलली असल्याचे महत्त्वाचे सूचन या विश्लेषणातून अधोरेखित झाले आहे. आजच्या संदर्भात कादंबरीच्या केंद्रस्थानी असलेले वास्तववादी, खंडित वास्तव आणि रूपदृष्ट्या सजग अशा तीन प्रकारांत हे विवेचन केलेले आहे. पहिल्या दोन प्रकारांतील कादंबऱ्यांपेक्षा तिसऱ्या प्रकारची मराठी कादंबरी वास्तववादाच्या मर्यादा ओलांडून वास्तवाचे विविध आयाम तिने स्पष्ट केल्याचा निष्कर्ष नोंदवला आहे. समाजवास्तवाला केंद्रस्थानी ठेवून पात्रे, कथानकरचना, कथनतंत्रे, कथनव्यवस्था आणि भाषा या घटकांच्या आधारे प्रयोगशील कादंबरीचा घेतलेला परामर्श महत्त्वाचा आहे.

''नव्वदनंतरच्या कादंबरी रूपबंधात एकच एक कथानक किंवा एखाद्या व्यक्तिरेखेला ठळक न करता, अनेकविध कथांचे कोलाज उभे केले आहेत. काळाची गुंतागुंत किंवा कादंबरीगत वास्तवात काळाची सरमिसळ केलेली दिसते. कथनव्यवस्थेच्या अनेक शक्यता, पात्ररचनेचे नवे दृष्टिकोन हे सगळे या कादंबऱ्यांनी रूपबंधात अशा पद्धतीने सामावले आहे की, वास्तवाच्या बदलाची गती पकडण्याचा प्रयत्न होतो आहे. वर्तमानाचे विविध कोन प्रकाशमान करत, समाजवास्तवातील मानवी जीवनाचे तळकोपरे शोधले जात आहेत. वर्तमानाला भारित करणारी व्यवस्था पकडण्याचा आणि या प्रयत्नांतून हाती आलेले वास्तव आणि त्याच्या सत्यतेची साशंकता यामुळे भोवताल



Scanned with OKEN Scanner

पकडण्याच्या प्रयत्नांचीच गोष्ट आता कादंबरी सांगू पाहते. कादंबरीत रचिताच्या जागा उघड करून दाखविण्याची पाश्चात्त्य साहित्यात मळलेली वाट, आपल्याकडे नव्याने रुजत आहे. यामुळे कादंबरीगत वास्तवात रचिताची जाणीव सतत राहील, अशी भूमी कादंबरीत दिलेली दिसते. वास्तव आणि रचितवास्तव यातून मार्ग काढत, नवे समाजभान आविष्कृत करण्याचा प्रयत्न कादंबरीकार करत आहेत'' (पृ.५६). हे निरीक्षण नव्वदनंतरच्या प्रयोगशील कादंबरीचे स्वरूप विशद करणारे आहे. यातून या काळातील कादंबरीचा पैस तर उलगडतोच; शिवाय तो उलगडून दाखवण्यासाठी कादंबरी समीक्षकाजवळ समाज आणि साहित्यव्यवहार समजून घेणारी जी व्यापक आकलनक्षमता असावी लागते, तीही दिसते. 'कादंबरी : वर्तमानाचे नवे रचित' हा लेखही उपरोक्त प्रांडणीला पुष्टी देणारा आहे. नव्वदनंतरची एकूणच मराठी कादंबरी वर्तमानाचे रचित कशी आहे, याचे साधार विवेचन या लेखातून आलेले आहे.

भालचंद्र नेमाडे हे गेल्या अर्धशतकातील महत्त्वाचे कादंबरीकार म्हणून सर्वपरिचित आहेत. त्यांचा कादंबरी, समीक्षा आणि मुलाखतींमधून व्यक्त झालेला समीक्षाविचार या काळात सतत चर्चेच्या केंद्रस्थानी राहिलेला आहे. त्यांच्या लेखन व भूमिकेच्या अनुषंगाने झालेल्या उलटसुलट टीकेने मराठी समीक्षाविचाराचे पोषण झालेले आहे. त्यांनी आजमावलेल्या कादंबरीनिर्मितीच्या आविष्कारशक्यता आणि देशीवादाची मराठीत केलेली मांडणी यामुळे नवे चर्चाविश्व आकाराला आले. त्यांचा जसा वाचकांचा चाहता वर्ग निर्माण झाला; तसाच त्यांच्या लेखनाचे अनुकरण करणारा, प्रभावात असणारा आणि त्यांच्या साहित्यविचाराची बाजू घेणारा मोठा वर्गही निर्माण झाला. त्यालाच 'नेमाडपंथ' असेही संबोधले गेले. त्यांच्या साहित्याची आरोपप्रत्यारोपी स्वरूपाची वा एकांगी अशी विपुल समीक्षा झाली; पण या साहित्याचे तटस्थ आणि मर्मग्राही मूल्यमापन फारच थोड्या लोकांनी केल्याचे लक्षात येते. या संदर्भात 'नेमाडे प्रभावातील मराठी कादंबरी', 'भालचंद्र नेमाडे यांच्या कादंबऱ्यांचे आविष्कारविशेष' व 'हिंदू जगण्याची समृद्ध अडगळ : सांस्कृतिक परिप्रेक्ष्य' हे तीन लेख या ग्रंथात समाविष्ट आहेत. या लेखांतून नेमाडे यांच्या कादंबरीलेखनाचा प्रभावसंबंध तपासत, आविष्कारविशेषांचा घेतलेला वेध त्यांच्या कादंबरीलेखनाची सामर्थ्यस्थळे अधोरेखित करणारा आहे.

गेल्या अर्धशतकातील मराठी कादंबरीवर भालचंद्र नेमाडे यांचा कसा प्रभाव आहे, याचा शोध घेत असताना त्यांनी मराठी कादंबरीपरंपरेत कोणती भर घातली आणि कोणत्या वाटा निर्माण केल्या, याचेही सूक्ष्म विवेचन केले आहे. त्यासोबतच नेमाडे यांनी कादंबरीलेखनाबरोबरच मांडलेल्या देशीवाद, नवनैतिकता आणि वास्तववाद या संकल्पनांचा विचारही या मांडणीत सामावलेला आहे. समकालीन कादंबरीत झिरपलेली नेमाडे यांची जीवनदृष्टी, विचारव्यूह आणि त्यातून कादंबरीचा आशयव्यवहार, कथानक, पात्रकथन, भाषा यांना प्राप्त झालेल्या आकाराचा अन्वय लावत, येथे प्रभावशीलतेचे विश्लेषण केले आहे. एकूण मराठी अभिरुचीला योग्य वळण लावण्याचा प्रयत्न करणाऱ्या नेमाडे यांच्या साहित्यविचारांचा खोलवर प्रभाव मराठी कादंबरीवर कसा आहे, याचे उदाहरणासहित विश्लेषण यात आले आहे. ''रूढ कादंबरीची संकल्पना आणि संरचना तिचा ठरीव रूपबंध नाकारून नेमाडे यांच्या 'कोसला' या कादंबरीने कादंबरी या वाङ्मयप्रकाराचे एक वेगळे रूप मराठी वाचकांसमोर ठेवले. याचा परिणाम असा झाला की, मराठी कादंबरीच्या प्रवासाच्या दिशा बदलत गेल्या''(पृ.६७). या निरीक्षणाला मध्यवर्ती ठेवत केलेली प्रभावमीमांसा समकालीन मराठी कादंबरीचे यथोचित मूल्यनिर्णयन करणारी आहे. हा प्रभाव पचवत आपल्या स्वतःच्या स्वतंत्र वाटा निर्माण करणारे कादंबरीकार म्हणून रंगनाथ पठारे, राजन गवस, सदानंद देशमुख, रमेश इंगळे-उत्रादकर, प्रवीण बांदेकर व महेंद्र कदम या लेखकांचा निर्देश करत मांडलेली



Scanned with OKEN Scanner

निरीक्षणे मोलाची आहेत. नेमाडे यांच्या प्रभावातून निर्माण झालेल्या कादंबरीने मराठी कादंबरीत आशादायक चित्र निर्माण केल्याची नोंदही घोलप यांनी केलेली आहे.

'कोसला'(१९६०) ते 'हिंदू : जगण्याची समृद्ध अडगळ' (२०१०) हा भालचंद्र नेमाडे यांचा कादंबरीप्रवास मराठी कादंबरीपरंपरेत ऐतिहासिक आहे. पारंपरिक कादंबरीच्या आकृतिबंधाचे संकेत मोडून, नवी कादंबरी घडविण्याचे काम त्यांनी केले आहे. विशाल जीवनाशयाला कादंबरी संरचनेत रिचवत, कादंबरीच्या घाटाला नव्या रूपबंधाचा आकार देऊन त्यांनी निर्मिलेली कादंबरी वैशिष्ट्यपूर्ण ठरलेली आहे. या कादंबऱ्यांच्या आविष्कारविशेषांचा वेध घोलप यांनी वस्तुनिष्ठपणे घेतला आहे. ''नेमाडे यांनी लेखनातील गांभीर्य टिकवून कलात्मकतेची उंची वाढविली. व्यापक समाजचित्रण करून कादंबरीला चिंतनाभिमुख बनविले. आपल्या कादंबऱ्यांतून नव्या मूल्यविचारांची मांडणी केली. अनेक स्तरांवरील संवेदना त्यांच्या कादंबऱ्यांमधून प्रतिबिंबित होतात''(पृ.७९). हे मत नोंदवत, घोलप यांनी नेमाडे यांच्या कादंबरीलेखनाच्या अभिव्यक्तीचा परामर्श घेतलेला आहे. कादंबरीचा रूढ साचेबंदपणा नाकारून नवकादंबरी निर्मिल्याचे प्रतिपादन विस्ताराने त्यांनी केले आहे. रूपभान, आशयभान आणि भाषाभानाची नवी जाणीव मराठी कादंबरीत पात्र, वर्णन, भाष्य, संवाद व प्रामुख्याने निवेदन-कथन या आविष्कार विशेषाधारे सर्जकपणे कादंबरी संरचनेत नेमाडे यांनी निर्माण केली. शैली आणि व्याकरणदृष्ट्याही त्यांच्या कादंबरीने चोखाळलेली वाट दिशादर्शक आहे. महानुभावीय गद्यशैलीचा प्रभाव आणि मराठीच्या विविध बोलींचा संदर्भासहित त्यांनी केलेला आविष्कार, याचाही निर्देश घोलप यांनी केलेला आहे. ही कादंबरी प्रयोगशील असूनही वाचकप्रिय ठरली; म्हणून नेमाडे हे श्रेष्ठ कादंबरीकार असल्याचे मत त्यांनी मांडले आहे. मोरगाव ते सिंधुसंस्कृती-पासूनच्या मोठ्या कालावकाशाला कवेत घेत कृषिसंस्कृतीचा विकास व स्थित्यंतराची विशालपटावर मांडणी करणाऱ्या 'हिंदू : जगण्याची समृद्ध अडगळ' या कादंबरीची सांस्कृतिक परिप्रेक्ष्यात चिकित्सा करणारा स्वतंत्र लेख या ग्रंथात समाविष्ट आहे. आविष्कार-विशेषांचा आढावा घेत, या कादंबरीतून बहुजन संस्कृतीचा विस्तृत पट आणि मूल्यव्यवस्था कशी प्रकटते, याचे मूल्यमापन केले आहे. भालचंद्र नेमाडे यांच्या कादंबरीआकलनाच्या दृष्टीने हा लेख महत्त्वाचा आहे.

कृषिकेंद्रित ग्रामसंस्कृती व समाजव्यवस्था हा भारतीय जगण्याचा मूलाधार आहे. शेतीच्या आरंभापासूनच समाज नावाच्या संकल्पनेला मूर्त रूप आले; म्हणूनच आदिम काळापासूनचा कलाविष्कार हा शेती, निसर्ग व प्राणिकेंद्री समूहाच्या भावजीवनाची अभिव्यक्ती करणारा आहे. साहित्यातूनही हीच जाणीव प्रबळ ठरलेली दिसेल; परंतु जन आणि अभिजनांच्या संघर्षात जनांची अभिव्यक्ती मध्यवर्ती धारेतून बाजूला फेकली गेली, ती थेट स्वातंत्र्यापर्यंत. ब्रिटिश राजवटीने दिलेली आधुनिक दृष्टी आणि समाजसुधारकांच्या सुधारणावादी चळवळींमुळे जनवादी प्रवाहातील विविध शोषित समूह जागृत झाले. त्यांना आत्मभान आले. हळूहळू ते आपले जीवन साहित्यातून मांडू लागले. ही जाणीव स्वातंत्र्याच्या आगेमागे मराठी साहित्यात निर्माण झाली; परंतु या जाणिवेला खरी ओळख साठनंतरच मिळाली. या जाणिवेतून निर्माण झालेल्या प्रवाहांना साठोत्तरी साहित्यप्रवाह म्हणून संबोधले गेले. त्यातील ग्रामीण साहित्यप्रवाह हा एक महत्त्वाचा प्रवाह आहे. आधुनिक काळाच्या प्रारंभी म.जोतीराव फुले यांनी ग्रामीण जीवनातील वास्तवाचा व शोषणाचा अंतर्मुख करणारा वेध साहित्यातून घेतलेला होता; परंतु काही अपवाद सोडले, तर त्या वाटेने साठपर्यंत फारसे कुणी गेलेले दिसत नाही. प्रारंभापासूनच म.फुले यांनी निर्मिलेल्या वाटेने ग्रामीण साहित्याचा प्रवास झाला असता, तर ग्रामीण साहित्याचा प्रवाह भारतीय पातळीवर सशक्तपणे उभा राहण्याची शक्यता होती.



Scanned with OKEN Scanner

ग्रामीण साहित्यसमीक्षेची स्थितीही फारशी समाधानकारक नाही. कादंबरीही त्यानेच लिहायची आणि त्याची समीक्षाही त्यानेच करायची, असा हा सारा मामला. संकल्पना-प्रेरणा मांडणीतील गोंधळलेपण, वैचारिक अधिष्ठानाबद्दलची अस्पष्टता आणि कलाकृतीच्या आकलनासाठीच्या निश्चित सिद्धान्तव्यूहाचा अभाव या समीक्षेतून अधोरेखित होतो.

या पार्श्वभूमीवर दत्ता घोलप यांनी या ग्रंथातील 'स्वातंत्र्यपूर्व मराठी ग्रामीण कादंबरी' आणि काही कादंबऱ्यांवरील स्वतंत्र लेखांच्या माध्यमातून केलेली ग्रामीण कादंबरीची समीक्षा काहीएक भूमिका घेऊन कादंबरीचा अन्वयार्थ लावू पाहते. मराठी ग्रामीण कादंबरीच्या प्रारंभकाळातील निर्मिती, वाटचाल आणि स्थित्यंतराचा वेध या प्रवाहाचा आरंभ शोधत घेतला आहे. १८८८च्या 'बळीबा पाटील' या कादंबरीच्या निर्मितीपासून ते १९५०पर्यंतच्या कालखंडातील मराठी ग्रामीण कादंबरीचे स्वरूप यातून उलगडले आहे. या काळातील कादंबरी आणि कादंबरीकार यांची सामाजिक, सांस्कृतिक अवकाशात इतिहासाचे पुनर्वाचन करत, ऐतिहासिकदृष्ट्या विस्ताराने नोंद घेतली आहे. म.फुले यांच्या विचारविश्वाने प्रभावित झालेल्या कृष्णराव भालेकर यांच्या 'बळीबा पाटील' या कादंबरीचे प्रथमच यथोचित विश्लेषण करून, त्यांच्या कादंबरीवाङ्मयाचे योगदान घोलप यांनी साधार अधोरेखित केले आहे. या कादंबरीचे पहिलेपण आणि कादंबरीपणाची चिकित्सकपणे मांडणी करत, तिचे विशद केलेले महत्त्व ग्रामीण साहित्यसमीक्षेत नवी भर घालणारे आहे. प्रारंभापासून ते स्वातंत्र्यापर्यंतच्या ग्रामीण कादंबरीचे रचनाविशेष नोंदवत आढावा घेतल्यानंतर दत्ता घोलप यांनी या कालखंडातील कादंबरीचे निष्कर्षात्मक स्वरूप सांगितले आहे. ते लिहितात, ''स्वातंत्र्योत्तर कालखंडाच्या तुलनेत हे स्वरूप आपल्याला साचेबद्ध, संकेतशरण असेच दिसते. असे असले, तरी या कालखंडातही मोजक्या लेखकांनी कादंबरीलेखनात काहीएक समज दाखविलेली दिसते. अर्थात, हे प्रयत्न अत्यल्प होते. शिवाय, ते काही मर्यादेपर्यंत होते. परंतु स्वातंत्र्योत्तर मराठी कादंबरीच्या बदललेल्या स्वरूपाच्या पूर्वखुणा वाटाव्यात, असे हे कादंबरीलेखन आहे''(पृ.१०३).

या लेखाबरोबरच ग्रामीण समाज, वर्तमान वास्तव आणि बोलीचे आविष्करण करणाऱ्या चार कादंबऱ्यांवरील स्वतंत्र लेखही या ग्रंथात अंतर्भूत आहेत. 'समकालीन समाजवास्तवाचा पारदर्शी लेखाजोखा : आगळ' हा लेख महेंद्र कदम यांच्या कादंबरीतील ग्रामवास्तवाचे विश्लेषण करणारा आहे. खेड्याची चहूबाजूंनी होणारी पडझड आणि उद्ध्वस्तीकरणाचा लेखाजोखा या कादंबरीने कसा मांडला आहे, याचे समर्पक विवेचन केले आहे. आगळ ही प्रयोगशील कादंबरी असून, तीमधून सोलापूर आणि परिसराचा भाषिक प्रदेश आल्याने मराठी कादंबरीतील सोलापुरी ग्रामबोलीची उणीव भरून काढल्याची योगदानात्मक नोंदही या कादंबरीच्या संदर्भाने अभ्यासकाने केली आहे. १९८०नंतरच्या पिढीतील महत्त्वाचे कादंबरीकार आणि प्रथमच कृषिजन साहित्य संकल्पनेची मांडणी करणाऱ्या राजन गवस यांच्या कादंबरीची मीमांसा करणारा 'ब,बळीचा : कृषिजन संस्कृतीच्या मूल्यव्यवस्थेची पुनर्मांडणी' हा लेखही मोलाचा आहे. वर्तमान कृषिजन जीवनव्यवस्थेचे समग्रतेने चित्रण 'ब,बळीचा' या कादंबरीमधून प्रकटल्याचा निर्देश येथे केला आहे. आशयातील बहुस्तरीयत्व, कथनतंत्र आणि कालावकाशाच्या बहुआयामीपणाचे नेमके आकलन या लेखातून करण्यात आले आहे. 'ग्रामसमूहाच्या स्थित्यंतराचे तळदर्शन' हा लेख प्रसाद कुमठेकर यांच्या उदगिरी बोलीचा लहेजा घेऊन अवतरलेल्या 'बारकुल्या बारकुल्या ष्टोऱ्या' या प्रयोगशील कादंबरीचा परामर्श घेणारा आहे. सूक्ष्म पातळीवरील गावखेड्यातील तळदर्शन, त्यातील स्थित्यंतर आणि प्रदेशविशिष्ट भाषा व प्रादेशिक संस्कृतिभूगोलाच्या आविष्कारामुळे या कादंबरीचे महत्त्व लक्षात घेणे आवश्यक असल्याचे सूचन घोलप



Scanned with OKEN Scanner

यांनी केले आहे. सदानंद देशमुख हे मराठी साहित्याला बदलत्या शेती वास्तवाची अभिव्यक्ती करणारे कथा-कादंबरीकार म्हणून परिचित आहेत. नवभांडवलीकरणाच्या आक्रमणाने मरणासन्न झालेल्या शेतीव्यवस्थेचा आशय त्यांनी 'चारीमेरा' या कादंबरीतून उजागर केला आहे. या कादंबरीच्या आशयाविष्काराचे विश्लेषण 'चारीमेरा : कृषिव्यवस्थेतील भू-सांस्कृतिक बदलाचा वेध' या लेखातून केले आहे. वर्तमान शेतीस्थितीची पडताळणी करत केलेले हे विवेचन मूलभूत स्वरूपाचे आहे. कृषिकेंद्रित समूहाचा जीवनार्थ उपरोक्त कादंबरीकारांनी आपल्या कादंबऱ्यांमधून कशा प्रकारे प्रकट केला आहे, याचा घोलप यांनी घेतलेला शोध अभ्यासकांना पायाभूत ठरावा असाच आहे.

जागतिकीकरणाने भारतीय समाजव्यवस्थेवर दूरगामी परिणाम केले. नवभांडवलीकरणाच्या प्रक्रियेने नवी बाजारू संस्कृती आकाराला आली. त्यात सर्वसामान्य-सर्वहारांचे जगणे अधिक कंगाल आणि मूठभरांची समृद्धी होत गेली. नवे शोषणशास्त्र व लूटकेंद्र निर्माण झाल्याने येथील कष्टकरीवर्ग अधिक पिचत गेला. त्याचा अस्तित्वासाठी संघर्ष सुरू झाला. जात, धर्म, भाषा, वर्ग, राजकारण, शिक्षण, संस्कृती, शेती, छोटे उद्योग, निसर्ग, पर्यावरण यांसह अनेकविध बाबींवर गंभीर परिणाम झाले. नवा मूल्यसंगर प्रारंभित झाला. त्यामुळे भारतीय समाजव्यवस्थेत उलथापालथ घडून आली. त्यातून जे समाजवास्तव आकाराला आले, त्याला मराठी लेखक-कवींनी वेगवेगळ्या नजरेतून प्रतिसाद दिला. मराठी कादंबरीनेही या अनुभवरूपांना साक्षात करण्याचा प्रयत्न केला आहे. 'जागतिकीकरणाच्या पार्श्वभूमीवरील आशयघन आविष्कार' या लेखाच्या माध्यमातून दत्ता घोलप यांनी दिनानाथ मनोहर यांच्या 'कबीरा खडा बाजार में' या कादंबरीचे मूल्यमापन केले आहे. बाजारकेंद्री व्यवस्थेचे भारतीय समाजावर कसे परिणाम होत आहेत, या परिणामाचा स्तर नि त्यातील व्यामिश्रता कोणत्या स्वरूपाची आहे, या परिणामांचा समाजव्यवस्थांशी कसा संबंध आहे, याचा दिनानाथ मनोहर यांनी कादंबरीतून घेतलेल्या या शोधाची अभ्यासपूर्वक पडताळणी घोलप यांनी केली आहे. ही पडताळणी करताना आशय-आविष्काराचे नातेही उलगडून दाखविले आहे. या कादंबरीसंबंधाने निरीक्षण नोंदवताना ते लिहितात, "जागतिकीकरणामुळे निर्माण झालेल्या संक्रमणावस्थेतील भारतीय समाजजीवनाचे चित्रण करणारी ही कादंबरी संमिश्र समाजवास्तव घेऊन येते. सामाजिक वास्तव हेच कादंबरीचे आशयद्रव्य आहे. त्याला पेलून धरणारी भाषाकथनाची पद्धत हे मनोहरांच्या लेखनशैलीचे विशेष आहेत. बरेच लेखक वाङ्मयीन संकेताचा वापर आशयाचा थिटेपणा झाकण्यासाठी करतात. परंतु, मनोहर आपल्या आकलनाला चिंतनशीलतेचे रूप देणारी प्रभावी शैली योजतात" (पृ.११३,११४).

प्रवीण बांदेकर हे जागतिकीकरणोत्तर काळातील महत्त्वाचे कादंबरीकार आहेत. या काळातील वास्तवाचा सत्यार्थ त्यांच्या कादंबऱ्यांमधून प्रकटतो. धर्म हा माणसाला संस्कारी नि शांततामय जगण्याचे नियमन करणारी व्यवस्था म्हणून उदयाला आला. दिवसेंदिवस हा मूळ उद्देश बाजूला पडून, त्याचे स्वरूप कर्मकांडी आणि शोषणकेंद्री बनत गेले. आज या व्यवस्थेने समाजात अराजक निर्माण केले. धर्माच्या मूठभर ठेकेदारांनी स्वार्थापोटी बहुसंख्याकांच्या धर्मभोळेपणाचा फायदा घेत, धर्माचा टूल म्हणून वापर सुरू केला. लोकशाहीवादी, पुरोगामी, सुधारणावादी विचारकांना मारण्यापर्यंत सनातनी आणि प्रतिगाम्यांची मजल गेली. ही प्रवृत्ती अधिक गंभीर बनत चालली आहे. धर्मांधांची सामान्य लोकांना आकर्षित करणारी व्यवस्था आणि कृतिशून्य असलेला बुद्धिजीवीवर्ग या समकालीन वास्तवाचे विविध कोनांतून चित्रण प्रवीण बांदेकर यांनी 'उजव्या सोंडेच्या बाहुल्या' या कादंबरीतून केले आहे. या कादंबरी संहितेचे सूक्ष्म आकलन दत्ता घोलप यांनी 'समकालीन भारतीय समाजवास्तवाची



Scanned with OKEN Scanner

फॅण्टसी : उजव्या सोंडेच्या बाहुल्या' या लेखातून मांडले आहे. ''भारतीय समाजवास्तवात समकाळात दिसणाऱ्या धार्मिक संस्थांबद्दल; तसेच त्यांच्या कारवायांबद्दल, पद्धतशीरपणे चालवलेल्या धर्मांध मूलतत्त्ववादी प्रचाराबद्दल ही कादंबरी उघड बोलते. सनातन्यांकडून जे सामान्य माणसाच्या वर्तनाचे मनोनियंत्रण करण्याचे प्रयत्न सुरू आहेत, त्याची पोलखोल केली आहे. हे करत असताना या सर्व वास्तवाला भारित करणारी धर्मसत्ता आणि राजसत्तेचे हितसंबंध उघड केले आहेत''(पृ.१३६). या पद्धतीने या कादंबरीच्या आशयाचे आणि कळसूत्री बाहुल्यांच्या रचनातंत्राचे विश्लेषण केले आहे. वर्तमान समूहसंस्कृतीचे वास्तव, भूमिकांचा वैचारिक मूल्यसंघर्ष आणि कादंबरीच्या घडणीच्या अनुषंगाने केलेले विश्लेषण महत्त्वपूर्ण आहे.

'इन्किलाब विरुद्ध जिहादची कथनव्यवस्था' हा लक्ष्मीकांत देशमुख यांच्या एका वेगळ्या विषयावरील कादंबरीवरचा लेख आहे. अफगाणिस्तानमधील पन्नास वर्षांच्या कालखंडातील राजकीय स्थित्यंतराचा आशय या कादंबरीतून प्रकट होतो. हा आशय ज्या कथनव्यवस्थेच्या माध्यमातून समोर येतो, त्याची मीमांसा येथे करण्यात आली आहे. आंतरराष्ट्रीय राजकारण, धर्मकारण, दहशतवाद यांनी अफगाणच्या भूमीवर जो उच्छाद मांडला, त्याला असणारे सामाजिक, सांस्कृतिक संदर्भ विविध कथनपद्धतीतून कसे उजागर झाले आहेत, याचे विश्लेषण या लेखातून आले आहे. कथाबाह्य आणि कथांतर्गत निवेदनाची विस्तृत चर्चा लेखातून आल्याने कादंबरीचा रूपबंध उलगडतो. आशय व अभिव्यक्तीतील अभिन्नत्व अधोरेखित करत, कादंबरीच्या आकृतिबंधाची केलेली चर्चा समर्पक आहे. संवाद, चर्चा, वर्णनपरता, बातमी यांसारख्या कथनरूपांचे बारकाईने विश्लेषण करून या कादंबरीची निर्मिती आशयाभिव्यक्तीच्या मागणीतून झाल्याचा निर्देश केला आहे. मराठीत कादंबरीची कथनपद्धती विश्लेषित करणारी समीक्षा फारच थोडी आहे. नुसता कादंबऱ्यांमधील आशय सांगत सुटणे, हाच प्रकार अधिक. झालेच तर कथानक, पात्र, भाषा यांची माहितीवजा जंत्री मांडण्यातच ही समीक्षा धन्यता मानते. कादंबरीच्या आशयाचे नाते हे कथनव्यवस्थेशी असते आणि दोहोंच्या सेंद्रियत्वातून कादंबरीचा रूपबंध आकारतो, ही दृष्टी ठेवून कादंबरीतील या नात्याचे सूक्ष्म विश्लेषण होणे अपेक्षित असते. ही अपेक्षा या लेखाने पूर्ण केली आहे.

या ग्रंथातील कादंबरीसमीक्षा ही संहितेचे अंतर्बाह्य मूल्यमापन करणारी आहे. कादंबरीचा अवकाश नि त्याला असणाऱ्या संदर्भाचे सूक्ष्म विश्लेषण, हा या समीक्षेचा महत्त्वाचा गुणविशेष आहे. संहितेवर लक्ष केंद्रित करणारी 'संहितालक्ष्यी' आणि संहितेच्या विविध संदर्भांना लक्षात घेणारी 'संदर्भलक्ष्यी' अशा दोन्ही व्यूहातून मराठी कादंबरीचे अर्थनिर्णयन केले आहे. या दोन्ही भूमिका या विश्लेषणात सामावलेल्या आहेत. दोन विभागांत विभागलेल्या या समीक्षेत दोन सूत्रे कार्यरत आहेत. पहिले सूत्र हे वाङ्मयेतिहासातील कालखंडाच्या तुकड्यांतील काही कादंबऱ्यांचे विशिष्ट संकल्पनेधारे त्या कालखंडातील एकूण कादंबऱ्यांचे स्वरूप स्पष्ट करणारे आहे. यातून समकालीन सामाजिक, सांस्कृतिक पर्यावरणाला मराठी कादंबरीने कसा प्रतिसाद दिला, याचे स्वरूप स्पष्ट झाले आहे. कादंबरीच्या मर्यादा, विकास आणि वाटचालही ध्वनित झाली आहे. कादंबरीकारांनी स्वीकारलेल्या भूमिकांचे आणि वाङ्मयेतिहासातील प्रमादांचे सूचनही विवेचनाच्या ओघात आलेले आहे. परंपरा निर्मिणाऱ्या कादंबऱ्या आणि कादंबरीकाराची बलस्थाने विशद झालेली आहेत. आशयाविष्काराच्या चर्चेतून मराठी कादंबरीच्या रूपघडणीचे स्वरूप समोर आले आहे. दुसरे सूत्र हे एकेका कादंबरीतून प्रतिबिंबित झालेल्या वास्तवाचे विश्लेषण करणे, या स्वरूपाचे आहे. या विश्लेषणात कादंबरीच्या कलाकृतीपणाची सखोल मीमांसा आली आहे. ही मीमांसा लेखकाचे विचारविश्व, जीवनदृष्टी, भूमिका, संवेदनस्वभाव आणि लेखनविशेष उलगडून



Scanned with OKEN Scanner

सांगणारी आहे. कादंबरी समीक्षेच्या पुनर्वाचनातून केलेले अर्वाचीन आकलनाच्या अंधाऱ्या जागा प्रकाशमान करणारे आहे. कादंबरीचे गुणदोष आणि वैशिष्ट्यांची केलेली चर्चा महत्त्वाची ठरणारी आहे.

मराठी कादंबरीनिर्मितीच्या तुलनेत ज्या गतीने समीक्षा व्हायला पाहिजे होती, ती झालेली दिसत नाही. इतर साहित्यप्रकारही त्याला अपवाद नाहीत. मराठी कादंबरीच्या प्रारंभापासून ते आजतागायत ही स्थिती बदललेली नाही. "साहित्याचा संबंध इतर कलांशी, माध्यमांशी आणि सामाजिक; तसेच सांस्कृतिक घटितांशी जोडण्याच्या क्षमतेचा अभाव; प्रभावासंबंधी चिकित्साशून्य आणि अज्ञानी दृष्टिकोन; आत्मभानाची आणि परंपरेची उणीव; समीक्षेचे मनःपूत आणि बेरचसे परकीय मानदंड."[२] ही गणेश देवींनी सांगितलेली भारतीय समीक्षेची मर्यादा मराठी समीक्षेलाही लागू आहे. म्हणूनच "या घडीला भालचंद्र नेमाडे आणि विलास सारंग असे दोनच कादंबरीचे चांगले म्हणावेत, असे समीक्षक आपल्याकडे आहेत."[३] असे विधान हरिश्चंद्र थोरात यांनी केले आहे. अलीकडच्या काळात समीक्षालेखन करणाऱ्या नव्या समीक्षकांची संख्या वाढते आहे; पण त्यात नुसतीच शेरेबाजी किंवा कुणाची वकिली तरी केलेली असते. वाचन, अभ्यास, चिंतन, व्यासंग आढळत नाही.

अक्षरवाङ्मय प्रकाशनाचे प्रकाशक बाळासाहेब घोंगडे यांनी केलेली देखणी ग्रंथनिर्मिती, गणेश विसपुते यांचे सुरेख मुखपृष्ठ आणि प्रा.रणधीर शिंदे यांची ग्रंथाचा गाभा विशद करणारी पाठराखण यामुळे ग्रंथाचे मूल्य वाढलेले आहे.

(सदर लेखासाठी 'मराठी कादंबरी : आशय आणि आविष्कार' अक्षरवाङ्मय प्रकाशन, पुणे-४१, २३ जुलै, २०१८, प्रथम आवृत्ती आधाराला घेतली आहे. कंसात दिलेले पृष्ठक्रमांक याच आवृत्तीतील आहेत)

संदर्भ :
१. वसंत आबाजी डहाके, मराठी साहित्य इतिहास आणि संस्कृती, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, २००८, पृ.२७५
२. गणेश देवी (अनु : म. सु. पाटील), स्मृतिभ्रंशानंतर, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, २००८, पृ. ३५
३. विलास खोले (संपा), विसाव्या शतकातील मराठी समीक्षा, प्रतिमा प्रकाशन, पुणे, २००४, पृ.११२

◆

---

'दुसरे करतील तेव्हा आपण करू', हा निव्वळ न करण्याचा बहाणा आहे. आपल्याला जे बरे वाटते ते आपण करावे, दुसऱ्यांना वाटले म्हणजे ते करतील. हाच कृती करण्याचा मार्ग आहे. स्वादिष्ट भोजन दिसले की, ते खाताना मी दुसऱ्याची वाट पाहत नाही. वरील प्रमाणे प्रयत्न करणे, दुःख भोगणे हे स्वादिष्ट भोजन आहे. त्रास वाटून हे करणे किंवा दुःख सोसणे ही केवळ वेठबिगारी आहे, हे समजून घेईल.

'महात्मा गांधी'

---



Scanned with OKEN Scanner